**CNR-MHAM120024532024**

कौटूंबिक हिंसाचार प्र.क्र.८८/२०२४
रईसाबी व इतर दोन वि. मुक्कदर

**आदेश निशाणी क्र. ७ खाली**
**(पारित दिनांक ०३/०६/२०२६)**

अर्जदाराने सदरचा अर्ज घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ नुसार अन्नधन्य कपडेलत्ते करीता दरमहा रूपये १५,०००/– तसेच घरभाडयाचे रूपये ३,०००/– असे दरमहा रूपये १८,०००/– अंतरीम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार ही गैरअर्जदाराची विवाहीत पत्नी असून त्यांचा विवाह दिनांक ०७/३/२०१३ रोजी मौजे दर्यापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथे झाला. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदाराचे घरी नांदावयास गेली. अर्जदारास गैरअर्जदाराने काही दिवस चांगली वागणुक दिली व त्यानंतर छोट्या छोट्या कारणांवरून शिवीगाळ करणे सुरू केले. तसेच, अर्जदार हिला "तु नंगचोटाच्या घरची आहे, तुझे वडील भिकारचोट आहे" असे म्हणून हिनवत असे. गैरअर्जदार हा अर्जदाराने स्वयंपाक केला असता पहिले तु आम्हाला पहिले जेवन करून दाखव नंतर आम्ही जेवतो असे म्हणून अर्जदाराने तयार केलेल्या जेवनावर सध्दा संशय घेत होता. गैरअर्जदारास दारूचे अत्यंत व्यसन होते. त्यामुळे तो रात्री बेरात्री दारूपिवून घरी यायचा व अर्जदारास मारहान करायचा. गैरअर्जदाराला हे सर्व व्यसन असल्याचे अर्जदार हिला लग्नाच्या दुस–या दिवशीच माहित पडले. अर्जदार हिला गैरअर्जदाराकडून सन २०१४ मध्ये आलीया परवीन नावाच्या मुलीला जन्म दिला व सन २०१६ मध्ये इरम फातेमा नावाच्या मुलीला जन्म दिला. परंतु दोन्ही मुलींच्या जन्मानंतर सुध्दा गैरअर्जदाराच्या वागणुकीमध्ये फरक पडला नाही. अर्जदारावरील त्याचे अत्याचार सुरूच राहीले.

३. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, सन २०२१ मध्ये गैरअर्जदाराने अर्जदारास मारहान करून घराबाहेर हाकलून दिले. त्यावेळी अर्जदाराने गैरअर्जदाराकडून

त्रासुन स्टॅम्प पेपरवर फारकत नामा सुध्दा करून घेतला होता. त्यानंतर सहा महिण्यांनी गैरअर्जदार हा पुन्हा अर्जदाराकडे आला व माफी मागीतली आणि यापुढे चांगल्या प्रकारे नांदवितो अशी हमी दिली आणि अर्जदार व दोन्ही बाळांना नांदावयास पुन्हा घेवून गेला. त्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदाराकडे जुन २०२४ पर्यंत कशीबशी त्रास सहन करीत नांदली. गैरअर्जदाराने अर्जदार हिला व दोन्ही बाळांना सुध्दा मारहान केली. तिच्या समक्ष दारू पिला आणि दोन्ही बाळांना सुध्दा मारहान केली आणि घराबाहेर हाकलून दिले आणि बजाविले की, “तु और तेरे दोनो भी लडकिया मनहुस है । मेरे को लडका होना था । तुने दोनो लडकिया पैदा की, तेरे को और दोनो बच्चो को मै कभी भी मेरे साथ मे नही रखुंगा” असे म्हणून एका वस्त्रानिशी घराबाहेर हाकलून दिले.

४. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, त्यानंतर अर्जदार ही कशीतरी स्वत:च्या माहेरी पोहचली आणि तेव्हापासून ते आजपावेतो अर्जदार ही दोन्ही बाळांचा स्वत: पालन पोषण करीत स्वत:च्या माहेरीच जिवन जगत आहे. अर्जदार हिला आईवडील सुध्दा नाहीत तसेच ती स्वत: अशिक्षीत आहे. अशा परिस्थीतीत ती सुध्दा शेजा-यांच्या भरवश्यावर स्वत:चे व दोन्ही बाळांचे जीवन व्यथीत करीत आहे. त्यामुळे गैरअर्जदाराकडून तिला व तिच्या बाळांना खावटी मिळण्याकामी तसेच इतर मागण्या पुर्ण होण्याकरीता सदर प्रकरण दाखल केले आहे.

५. अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, याउलट गैरअर्जदार हा कुशल बांधकाम कारागिर व ठेकेदार असून त्याला दररोज २,०००/- रूपये मजूरी मिळते. अर्जदार हिला तिचे अन्य धान्य कपडेलत्ते व उदनिर्वाहाकरीता दरमहा १०,०००/- असे एकुण २०,०००/- व औषधोपचारासाठी रूपये ५,०००/- खर्च येतो तसेच घरभाडे म्हणून ५,०००/- असे एकुण २०,०००/- खर्च येतो व तो खर्च देण्याची नैतीक जबाबदारी ही गैरअर्जदाराची आहे. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदाराकडून दरमहा रक्कम रूपये २०,०००/- अंतरीम खावटी मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल करून तो मान्य करण्याची विनंती केली आहे.

६. याउलट गैरअर्जदाराने आपले लेखी म्हणणे निशाणी क्र.११ वर दाखल करून अर्जदार ही गैरअर्जदाराची विवाहीत पत्नी असल्याचे नाकारले असून त्यांचा विवाह दिनांक ०७/०३/२०१३ रोजी झाल्याचे मान्य केले आहे. गैरअर्जदाराला हे सर्व व्यसन असल्याचे अर्जदार हिला लग्नाच्या दुस–या दिवशीच माहित पडले हे सुध्दा खोटे असल्याचे कथन केले आहे. तसेच, अर्जदार हिला आलीया परवीन आणि फातेमा नावाच्या मुली झाल्यानंतर सुध्दा गैरअर्जदाराच्या स्वभावात फरक पडला नाही व तिच्यावर सारखे अत्याचार सुरूच राहीले हे म्हणणे कपोलकल्पीत असल्याचे कथन केले आहे.

७. गैरअर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदाराने तो कुशल कामगार असल्याचे व त्याला २,०००/– रूपये रोज मिळत असल्याचे नाकारले. तसेच, अर्जदाराची पोटगीची मागणी ही चुकीची असत्याचे सांगीतले.

८. गैरअर्जदाराने पुढे कथन केले आहे की, अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी होती हया उभयतांमध्ये मत भिन्नता असल्याने आपसामध्ये वाद होते व ते वाद विकोपाला जात होते. त्यात नातेवाइकांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचे एकमत झाले नाही. त्यामुळे उभयतांनी वेगळे राहण्याचा निर्णय घेतला. त्यात गैरअर्जदाराने तिला कायदेशीर तलाक दिला व त्या तलाककरीता अर्जदार हिने त्यास दिनांक १०/०३/२०२१ रोजी अधिवक्ता रियाज घाणीवाले, नोटरी, दर्यापूर यांचे समक्ष खुलानामा देवून तलाक नाम्यास संमती त्याद्वारे मुस्लीम पंचांसमक्ष दिली. त्या दिवशी तिने लग्नामध्ये मुकरद ५०००/– रूपये मेहरची रक्कम स्वीकारली. त्यानंतर अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये पतीपत्नी म्हणूनचे नाते संपुष्टात आहे व त्या तारखेनंतर अर्जदार व गैरअर्जदारांमध्ये कोणतेही पतीपत्नी म्हणून कोणतेही संबंध आले नाही. अर्जदार हिने कपोलकल्पीत घटना तयार करून गैरअर्जदाराजवळ जाण्याचा खोटा प्रयत्न चालविला आहे. अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी राहली नसल्याने तसेच ती १०/०३/२०२१ नंतर गैरअर्जदाराचा तिच्याशी कोणताही संबंध न आल्यामुळे तिचा प्रस्तुत अर्ज खोटा व बनावटी असल्याने तो खारीज होवून तिला ५,०००/– रूपये दंड देण्यात यावा तसेच अर्जदार हिने दाखल केलेला अंतरिम खावटीचा अर्ज नियमबाहय असल्याने तो खारीज करावा अशी विनंती केली आहे.

९. खालील मुद्दे विचारार्थ उपस्थीत झाले व त्यावर मी माझे निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह नोंदविले.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार ही दरमहा रूपये १५,०००/- व घरभाडे दरमहा रूपये ३,०००/- असे एकूण १८,०००/- मागणी केल्याप्रमाणे अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशत: होकारार्थी |
| २ | काय आदेश ? | अर्जदारांना दरमहा रक्कम रूपये ३,०००/- अंतरिम खावटी दयावी. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीता :**

१०. अर्जाचे व कागदपत्रांचे अवलोकन केलेले. अर्जदार आणि गैरअर्जदारांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदाराने त्याचे मालमत्तेचे आणि दायित्वचे प्रमाणपत्र नि.क्र.१४ वर दाखल केले आहे. तसेच, अर्जदाराने त्याचे मालमत्तेचे आणि दायित्वचे प्रमाणपत्र नि.क्र.१५ वर दाखल केले आहे.

११. या ठिकाणी मला सुरूवातीलाच नमुद करावेसे वाटते की, अर्जदार व गैरअर्जदार यांना उभयतांमधील वैवाहिक व कौटूंबिक संबंध मान्य व कबुल आहेत. तसेच, अर्जदार हिने गैरअर्जदार यांनी तिचा कौटुंबिक छळ केल्याचे आरोप केले आहे. त्या अनुषंगाने महिलांचा कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण या कायदयाचे कलम ३ नुसार कौटूंबिक हिंसाचाराची व्याख्या सर्व प्रथम समजून घेणे आवश्यक आहे.

१. पिडीताचे शारिरीक, लैंगीक, शाब्दीक, भावनिक, आर्थीक छळ करणे किंवा मानसीक छळ करणे, शारिरीक छळ, धमकावने, मारहान करणे व शारिरीक इजा पोहचवणे,

२. लैंगीक छळ, महिलेस अपमानित करणे, भावना दुखावतील असे शब्द वापरणे, टोमणे मारणे, आवश्यक त्या आर्थीक गरजा न पुरवणे म्हणजेच पिडीत महिलेचा कौटूंबिक छळ करणे असा होतो.

१२. म्हणून, कौटुंबिक हिंसाचार कायदयाचे कलम २३ अंतर्गत आदेश पारित करीत असतांना अर्जदाराने गैरअर्जदाराकडून तिच्यावर कौटुंबिक अत्याचार झाल्याचे प्रथमदर्शनी शाबीत केले पाहिजे. याच कसोटीवर, अर्जदारांचे काय म्हणणे आहे हे पाहणे गरजेचे आहे.

१३. अर्जदाराचे अर्जातील मजकूर तसेच कौटुंबिक हिंसाचाराची बाब सिध्द करण्यासाठी अर्जदार हिने अर्जासोबत दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात अर्जातील नमुद कथनांची शपथेवर पुनरावृत्ती केली आहे. अर्जदाराने अर्जात कथन केले आहे की, गैरअर्जदाराने तिचा वेगवेगळया कारणावरून व हुंडयाच्या पैशाच्या कारणावरुन शारिरीक व मानसीक छळ केला तसेच गैरअर्जदाराने अर्जदारास सन २०२१ मध्ये अतोनात मारहान करून घराबाहेर हाकलुन दिले होते. तेव्हापासून ती तिच्या माहेरी दोन्ही मुलींसोबत राहत आहे. तेव्हापासून गैरअर्जदाराने तिच्या उदरनिर्वाहाकरीता कोणतीही व्यवस्था केलेली नाही.

१४. अर्जदाराने मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत गैरअर्जदाराकडून अर्जदार व तिच्या दोन्ही मुलींकरीता दरमहा रक्कम रूपये १५,०००/– व घरभाडे दरमहा रक्कम रूपये ३,०००/– असे एकूण दरमहा रक्कम रूपये १८,०००/– रूपये अंतरीत पोटगीची मागणी केली आहे. अर्जदाराने तिच्या मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्रामध्ये ती घरकाम करीत असून तिच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. तसेच, तिच्यावर तिच्या दोन्ही मुलांची जबाबदारी आहे असे कथन केले आहे. त्याचप्रमाणे, गैरअर्जदाराने त्याच्या मालमत्ता दायित्व प्रमाणपत्रात तो मजूरीचे काम करीत असून त्याला दरमहा ८,०००/– ते ९,०००/– रूपये उत्पन्न मिळते. तसेच, गैरअर्जदारावर त्याच्या आईची, दुस–या पत्नीची तसेच एक मुलगी व दोन मुलांची जबाबदारी आहे, असे कथन केले आहे. तसेच, गैरअर्जदाराने त्याच्या मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्रामध्ये त्याच्याकडे त्याच्या नावावर

कोणतीही स्थावर व जंगम मालमत्ता नसून तो त्याच्या आईच्या घरात राहत असल्याचे त्याने कथन केले आहे.

१५. गैरअर्जदाराने अर्जदारासोबतचा विवाहदिनांक १०/०३/२०२१ रोजी खुलानामा लिहून संपुष्टात आला असत्याचे कथन केले आहे. मात्र तो खुलानामा अर्जदाराने नाकारला आहे. गैरअर्जदाराने सन २०२४ पर्यंत अर्जदार हिला मानसिक व शारिरीक त्रास दिल्याचे अर्जदाराचे कथन आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांनी एकमेकांवर केलेले आरोप तसेच त्यांच्यामध्ये झालेला खुलानामा याची वैधता हा पुराव्याचा भाग असून त्याबाबत या ठिकाणी उहापोह करणे गरजेचे नाही. प्रथम दर्शनीय अर्जदार ही गैरअर्जदाराकडे नांदत असतांना तिचा कौटुंबिक छळ झाला व ती वेगळी राहत असल्यामुळे तिला तिच्या व तिच्या मुलीसाठी पोटगीची आवश्यकता आहे. याबाबीचा विचार करणे या ठिकाणी गरजेचे आहे.

१६. अर्जदाराने कथन केल्याप्रमाणे गैरअर्जदार हा कुशल बांधकाम कारागिर व ठेकेदार असून तो दररोज २,०००/– रूपये मजूरी मिळवितो. परंतु सदरची बाब सिध्द करण्याकरीता अर्जदाराने सदर अर्जासोबत गैरअर्जदाराच्या उत्पनाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. जेव्हा की गैरअर्जदाराने त्याच्या मालमत्ता दायित्व प्रमाणपत्रात तो दरमहा ८,०००/– ते ९,०००/– रूपये कमवितो व त्यावर त्याचा उदरनिर्वाह चालवित असल्याचे कथन केले आहे. यावरून गैरअर्जदार हा उत्पन्न मिळवित असून तो शारिरीक दृष्टया धष्टपुष्ठ असल्यामुळे व पती आणि वडील या नात्याने अर्जदारांचे पालनपोषणाची नैतीक व कायदेशीर जबाबदारी ही गैरअर्जदाराची आहे. त्यामुळे गैरअर्जदार यास सदर जबाबदारी टाळता येणार नाही. तसेच, गैरअर्जदाराने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाकरीता काही आर्थिक सहकार्य केल्याचे कथन केले नाही.

१७. याउलट, परिच्छेद क्र. १ मध्ये विषद केलेली कारणमिमांसा, तथ्ये व परिस्थीती लक्षात घेता, गैरअर्जदाराने अर्जदाराचा कौटुंबिक छळ/हिंसाचार केला व त्यांच्या पालनपोषणची जबाबदारी घेतली नाही हे दिसून येते. त्यामुळे वरील एकंदरीत चर्चा, दोन्ही पक्षांचे राहणीमान तसेच वाढती महागाई लक्षात घेता, प्रकारणाचा निकाल लागेपर्यंत सर्व

अर्जदारांना जीवन जगण्यासाठी व इतर गरजांसाठी अंतरिम पोटगीची रक्कम रूपये ३,०००/– चा आदेश करणे न्यायोचित होईल. परिणामी मी मुद्दा क्र.१ ला होकारार्थी उत्तर देवून मुद्दा क्र.२ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज निशाणी क्र. ५ अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदाराने अर्ज दाखल तारखेपासून अर्जदारांना दरमहा रूपये ३,०००/– (रुपये तिन हजार फक्त) जीवन जगण्यासाठी व इतर गरजांसाठी अंतरीम पोटगी म्हणून प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत दयावेत.

३. आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी.

ASHISH MOHAN JOSHI
Digitally signed by ASHISH MOHAN JOSHI
Date: 2026.06.03 16:48:27 +0530

दिनांक : ०३/०६/२०२६

(आशिष एम. जोशी)
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
दर्यापूर